Process Safety Beacon


http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx


उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश


CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

# आग प्रतिबंध – लांब बोल्ट असलेला फ्लँजविरहीत व्हॉल्व्ह

एप्रिल २०१०




क्रमांक १ च्या छायाचित्रातील धातूचे आवरण (पिवळ्या बाणाने दर्शविलेले) हें सुरक्षा उपकरणाचे महत्वाचे अंग आहे असे आपण मानता का? आपणास हे माहीत आहे का की जर हे आवरण खराब झाले किंवा गहाळ झाले असेल तर ते निदर्शनास आणले पाहीजे म्हणजे ते दुरुस्त अथवा बदली केले जाईल

धातूचे आवरण लांब बोल्ट असलेल्या फ्लँजविरहीत व्हॉल्व्हला (ज्याला लांब बोल्ट असलेला सँडविच, फ्लँजविरहीत किंवा वेफर व्हॉल्व्ह असेही म्हणतात) वेष्टीत करते. धातूचे आवरण काढलेली काही उदाहरणे २ आणि ३ क्रमांकाच्या छायाचित्रात लाल वर्तुळाने दर्शविली आहेत. या व्हॉल्व्हना पाइप किंवा टाकीच्या फ्लँजला जोडण्यासाठी एकसंध फ्लँज नसते. आणि ३ इंचापेक्षा (सुमारे ७ सेंमी) जास्त लांबीचे अनावृत्त बोल्ट असतात. जर त्या भागात आग लागली तर हे लांब बोल्ट प्रत्यक्ष आगीच्या संपर्कात (पर्याप्तपणे) येतात उष्णतेमुळे बोल्ट प्रसरण पावतात व त्यांची लांबी वाढते पर्यायाने व्हॉल्व्हच्या दोन्ही बाजूच्या गॅस्केटमधून गळती होते. जर गळणारे रसायन ज्वालाग्राही किंवा जळावू असेल तर आगीत तेल ओतल्यासारखेच होईल (छायाचित्र ४) जर पाइपच्या आंत उच्च दाब असेल तर आगीचा मोठा भडका होऊन अधिक नुकसान होऊ शकते.

धातूचे आवरण लांब बोल्टना आग प्रतिबंधक सामग्रीने गुंडाळून घेते व स्टेनलेस स्टीलच्या आवरणाने आग आणि उष्णतेच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचविण्यासाठी संपूर्ण जोडणी आवेष्टीत करते. हें एक महत्वाचे सुरक्षा उपकरण आहे. डागडुजीसाठी काढल्यानंतर पुन्हा व्यवस्थित जागेवर बसविले पाहीजे. तसेच ते सुस्थितीत असल्याची खात्री करण्यासाठी अधून मधून त्यांची तपासणी केली पाहीजे तसेच आवरण खराब झाले तर ते निदर्शनास आणले पाहीजे म्हणजे ते दुरुस्त केले जाईल




## आपण काय करु शकता ?

- आपल्या संयंत्रातील जळावू, ज्वालाग्राही किंवा द्रवरूप पेट्रोलियम वायूच्या पाइप्समध्ये लांब बोल्ट असलेले फ्लँजविरहीत व्हॉल्व्ह असतील तर त्यांवरील आवरणे सदैव व्यवथित असल्याची खात्री करा.
- लांब बोल्ट असलेल्या फ्लँजविरहीत व्हॉल्व्हवरील आवरणामुळे आंतील गंज किंवा इतर खराबी झाकली जाऊ शकते. आवरणाखालील फ्लँजेस आणि व्हॉल्व्हची पाहणी करण्यासाठी अधून मधून ती आवरणे काढावीत आणि पाहणी झाल्यावर ताबडतोब पुन्हा जागेवर बसवावीत.
- व्हॉल्व्हवरील प्रतिक्षेपात्मक अग्निशमन उपाय तात्पुरत्या स्वरुपाचे असून फार छोट्या आगींवर कामी येतात. फ्लँजविरहीत व्हॉल्व्हच्या जागी फ्लँज असलेले व्हॉल्व्ह बसविणे हाच एक स्वाभाविक सुरक्षित उपाय ठरेल.

**आपल्या सुरक्षा उपकरणांची जाणकारी ठेवा!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.